# आयुक्त तथा प्रशासक, अहिल्यानगर महानगरपालिका यांचकडून

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
# सार्वत्रिक निवडणूक - 2025-26

## :- जाहीर प्रकटन -:

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूची ड प्रकरण १ (निवडणूक नियम) क्र. ८ मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ / मनपा २०२५/प्र.क्र.८०/का. ०५ / दिनांक १५-१२-२०२५ अन्वये अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १ ते १७ च्या सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करिता निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर केला आहे. त्यानुसार मी यशवंत डांगे, आयुक्त तथा प्रशासक तथा निवडणूक अधिकारी, सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ , अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर या जाहिर प्रकटनाद्वारे अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ चा खालीलप्रमाणे नमूद केलेला निवडणूक कार्यक्रम घोषित करीत आहे.

परिशिष्ट - २

२८, महानगरपालिका (बृहन्मुंबई वगळून) सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम २०२५-२६)
(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ / मनपा-२०२५ / प्र. क्र. ८० / का.५,दि. १५/१२/२०२५ सोबतचे सहपत्र)

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरू अथवा पूर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|
| | मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक | दि. ०१ जुलै २०२५ (मंगळवार) |
| १ | आयुक्त, महानगरपालिका यांनी निवडणूक कार्यक्रमाची सूचना शासन राजपत्र व किमान दोन स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याची तारीख | दि. १८ डिसेंबर २०२५ (गुरुवार) |
| २ | नामनिर्देशनपत्र देण्याचा कालावधी | दि. २३ डिसेंबर २०२५ (मंगळवार) ते दि. २९ डिसेंबर २०२५ (सोमवार) (सकाळी ११ ते दुपारी ३)<br>दि. ३० डिसेंबर, २०२५ (मंगळवार), (सकाळी ११ ते दुपारी २)<br>(गुरुवार, दि. २५ डिसेंबर २०२५ व रविवार, दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी नामनिर्देशनपत्रे देण्यात येणार नाहीत) |
| ३ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | दि. २३ डिसेंबर २०२५ (मंगळवार) ते दि. ३० डिसेंबर २०२५ (मंगळवार) (सकाळी ११ ते दुपारी ३)<br>(गुरुवार, दि. २५ डिसेंबर २०२५ व रविवार, दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत) |
| ४ | नामनिर्देशनपत्रांची छाननी | दि. ३१ डिसेंबर २०२५ (बुधवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ५ | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे. | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच |
| ६ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | दि. ०२ जानेवारी २०२६ (शुक्रवार) पर्यंत (सकाळी ११ ते दुपारी ३) |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | दि. ०३ जानेवारी २०२६ (शनिवार)<br>(सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ८ | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे. | दि. ०३ जानेवारी २०२६ (शनिवार) |
| ९ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि. १५ जानेवारी २०२६ (गुरुवार)<br>(सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत) |
| १० | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | दि. १६ जानेवारी २०२६ (शुक्रवार)<br>(सकाळी १०.०० वाजल्यापासून) |
| ११ | शासन राजपत्रात निकाल प्रसिद्ध करणे. | दि. १९ जानेवारी २०२६ (सोमवार) पर्यंत |

ठिकाण : अहिल्यानगर
दिनांक : १८/१२/२०२५

**(यशवंत डांगे)**
आयुक्त तथा प्रशासक तथा निवडणूक अधिकारी,
अहिल्यानगर महानगरपालिका